# साने गुरूजी आरोग्य मंदिर
## SANE GURUJI AROGYA MANDIR
रजि. पब्लिक ट्रस्ट ई ९८२ मुंबई / R. Public Trust No : E 982 Mumbai

साने गुरूजी मार्ग, ऑफ एस.व्ही.रोड, टी.पी.एस.६, प्लॉट नं. ५, सांताक्रुझ (प.), मुंबई - ४०० ०५४. मो.: ९३२४७४२११२ / ८१०४४३९९३७
Sane Guruji Marg, Off. S.V. Road, T.P.S. 6, Plot No. 5, Santacruz (W), Mumbai - 400 054. Mob.: 9324742112 / 8104439937

जावक क्र./Outward No.:

दिनांक : २८.११.२०२४

**स्पर्धेचे नियम पुढीलप्रमाणे**

१. मुलींसाठी १०,१२,१४,१६ वर्षाखालील व १६ वर्षावरील तसेच मुलांसाठी १०,१२,१४,१६ वर्षाखालील १६ वर्षावरील असे वयोगट आहेत. प्रत्येक संघात ४ खेळाडू असतील, संघात ४ पेक्षा अधिक खेळाडू असल्यास त्या संस्थेने 'ब' संघ म्हणून प्रवेश घ्यावा. प्रत्येक वयोगटात संस्था 'अ' व 'ब' संघ स्पर्धेसाठी पाठवू शकतात. **दिव्यांग खेळाडूंसाठी हि स्पर्धा खुल्या वयोगटात घेण्यात येईल.**

२. सर्व वयोगटांसाठी स्पर्धा रविवार दिनांक २२डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ७.०० या वेळात घेण्यात येईल.

३. आपल्या संस्थेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंची गटवार नावे जन्मतारखेसह आमच्या https://www.mallakhambcompetition.com/ या सांकेतिक स्थळावर दिनांक १० डिसेंबर २०२४ पर्यंत नोंदवावी . उशिरा प्रवेशिका नोंदवण्यासाठी आयोजकांकडून १००/-रुपये अतिरिक्त नोंदणी शुल्क आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी श्री. यशवंत जाधव 9890999894 , श्री. राजेश अमराळे 9867777193 यांना संपर्क करावा.

जावक क्र./Outward No :

दिनांक : २८.११.२०२४

४. स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रती खेळाडू रुपये २५०/- आकारण्यात येईल. शुल्क भरल्याची पावती संस्थेकडून त्वरित घ्यावी. प्रवेश शुल्क भरल्यानंतर ते परत देण्यात येणार नाही किंवा त्यात फेरफार करता येणार नाही. आयोजकांचा निर्णय अंतिम राहील.

५. संघटनेच्या अधिकृत निमंत्रित पंचानी रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता येऊन आपली उपस्थिती स्पर्धासंचालकाकडे नोंदवावी.

६. प्रत्येक वयोगटातील पहिल्या ३ विजेताखेळाडूंना संस्थेतर्फे आकर्षक बक्षिसे व प्राविण्य प्रमाणपत्रे आणि सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रत्येक वयोगटातील पहिल्या २ विजेत्या खेळाडूंची निवड सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटू पुरुष व महिलांसाठी निवड करण्यात येईल.

७. स्पर्धास्थानी पंच व खेळाडू यांच्या मौल्यवान वस्तू , पैसे इत्यादी गहाळ झाल्यास संस्था व संघटना जबाबदार राहणार नाही.

८. निषेध फी रुपये १०००/- राहील. आपला संच संपल्यानंतर 30 मिनिटांच्या आत आपला निषेध स्पर्धा संचालकांकडे नोंदवावा.

९. स्पर्धेत फेरफार करण्याचा अधिकार संयोजक समितीकडे राहील.

१०. भाग्यपात्रिका दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी रात्री ९.०० वाजेपर्यंत दिलेल्या संकेत स्थळावर प्राप्त होईल.

११. तांत्रिक सहाय्यतेसाठी श्री. सुरज तुरटे 8898789288. यांच्या बरोबर संपर्क साधावा.

१२. नवोदित स्पर्धेकांसाठी सांघिक सर्वसाधारण विजेतेपद देण्यात येईल. सांघिक सर्वसाधारण विजेतेपदासाठी , प्रत्येक वयोगटातील पहिल्या 3 खेळाडूंच्या गुणांची बेरीज करण्यात येईल.

१४. स्पर्धा ठिकाणी एखाद्या खेळाडूला दुखापत झाल्यास आयोजकांकडून प्रथमोपचार देण्यात येईल.

१५. स्पर्धा प्रमुख म्हणून श्री. रवी गायकवाड व स्पर्धा संचालक श्री.यशवंत जाधव हे काम पाहतील.

आपला,

Patil

श्री. यशवंत पाटील
( कार्यवाह )

# साने गुरूजी आरोग्य मंदिर
## SANE GURUJI AROGYA MANDIR

रजि. पब्लिक ट्रस्ट ई ९८२ मुंबई / R. Public Trust No : E 982 Mumbai

साने गुरूजी मार्ग, ऑफ एस.व्ही.रोड, टी.पी.एस.६, प्लॉट नं. ५, सांताक्रुझ (प.), मुंबई - ४०० ०५४. मो.: ९३२४७४२११२ / ८१०४४३९९३७
Sane Guruji Marg, Off. S.V. Road, T.P.S. 6, Plot No. 5, Santacruz (W), Mumbai - 400 054. Mob.: 9324742112 / 8104439937


जावक क्र./Outward No.:

दिनांक : २८.११.२०२४

प्रति,

---------------------------

---------------------------

------------------------------

**विषय : पहिली कै.भाऊसाहेब रानडे मानचिन्ह नाशिक विभागीय नवोदित मल्लखांब स्पर्धा २०२४-२५**

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की साने गुरुजी आरोग्य मंदिर, यशवंत व्यायाम शाळा व नाशिक जिल्हा मल्लखांब संघटना आयोजित पहिली कै. भाऊसाहेब रानडे मानचिन्ह नाशिक विभागीय नवोदित मल्लखांब स्पर्धा रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी यशवंत व्यायाम शाळा , नाशिक येथे आयोजित करण्यात येणार आहे. हि स्पर्धा जिल्हा नाशिक ,जळगाव , धुळे , नंदुरबार येथील स्पर्धकांपुर्तीच मर्यादित आहे. स्पर्धेचे उद्घाटन दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता होईल. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष
श्री. दिपक पाटील व श्री यशवंत जाधव (सदस्य महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना ) यांच्या हस्ते होईल. स्पर्धेचा समारोप दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता होईल . समारोपासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. दिपक पाटील व श्री यशवंत जाधव उपस्थित राहतील. हि स्पर्धा, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना व नाशिक जिल्हा मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने घेण्यात येईल. या स्पर्धेचे स्पर्धाप्रमुख श्री. रवी गायकवाड व स्पर्धासंचालक श्री. यशवंत जाधव असतील.

त्याचप्रमाणे दिव्यांग विद्यार्थांसाठी विशेष मल्लखांब स्पर्धा त्याच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी कोणत्याही जिह्ल्यातील खेळाडू सहभाग घेऊ शकतो.